# पुणे विद्यापीठ, पुणे

महाराष्ट्र

# या विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी शोधसमितीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

पुणे विद्यापीठ ही उच्च शिक्षण देणारी संस्था असून पदविका, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण, व्यावसायिक आणि उदार शिक्षण कार्यक्रम उपलब्ध आहेत. आधुनिक अशा तांत्रिक संपर्क माध्यमातून उच्च शिक्षणाचा वापर करून, सदर विद्यापीठ प्रत्येक वर्षी २९० पेक्षा अधिक अभ्यासक्रम, सुमारे ६१३ संलग्नीत महाविद्यालये आणि ३४७ मान्यताप्राप्त संस्थांतून सुमारे ४.५० लक्ष विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ देते. या विद्यापीठाची १९४८ मध्ये स्थापना झाली असून सदर विद्यापीठ देशातच नव्हे, तर जगात एक प्रसिद्ध विद्यापीठ आहे. या विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्यास परदेशी विद्यार्थी प्राधान्य देतात.

महाराष्ट्र अधिनियम क्र. XIV२००९ दि. २५ जून २००९ अन्वये, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मध्ये शासनाने नुकतीच सुधारणा केलेली असून कुलगुरू पदावरील निवड प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असावी हा त्यामागील उद्देश आहे. कुलगुरू पदावर नियुक्त होणारी व्यक्ती ही प्रख्यात विद्वान असेल आणि ती स्वतःच्या उदाहरणाने नेतृत्व करण्यास समर्थ असेल, तिचा प्रशासकीय दर्जा उच्च असेल आणि ती विद्यापीठाला शैक्षणिक आणि व्यावसायिक दृष्ट्या सर्वोत्कृष्ट दर्जाचे केंद्र बनवेल.

कुलपती व मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी कुलगुरू पदासाठी सुयोग्य व्यक्तींच्या नावाची शिफारस करण्यासाठी त्रिसदस्यीय समितीची स्थापना केली आहे. (**ज्यामध्ये मा. न्या. श्री. मुकुल मुदगल, (सेवानिवृत्त), माजी मुख्य न्यायमूर्ती** पंजाब आणि हरीयाणा उच्च न्यायालय **(अध्यक्ष), डॉ. आर. एस. देशपांडे, संचालक, इन्स्टिट्यूट फॉर सोशल ॲण्ड इकॉनॉमिक्स चेंज,** बेंगलुरु आणि **श्री. संजय कुमार, प्रधान सचिव,** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा समावेश करण्यात आलेला आहे.)

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दिनांक २७.०५.२००९ च्या आदेशान्वये विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारण करीत असलेल्या आणि हे आव्हानात्मक नेमून दिलेले कार्य पेलण्यास इच्छुक असलेल्या उच्च विद्याविभूषित व्यक्तींकडून उपरोक्त शोध समिती अर्ज/नामनिर्देशन मागवीत आहे. शैक्षणिक अर्हता व अनुभव, अपेक्षित अनुभव आणि कौशल्य तसेच क्षमता, अर्जाचा नमुना इत्यादीबाबतचा तपशील विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर पदांसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांचे लक्ष महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम १२(५) कडे वेधण्यात येत आहे. सदर कलम खालीलप्रमाणे आहे.

**''कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती ही, तिच्या सेवा कराराच्या अटी व शर्तीना अधीन राहून, तिने अधिकारपद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा करार अवधी किंवा तिच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंतचा अवधी या दोन्हीपैकी जो कोणताही अवधी अगोदर पूर्ण होईल तोवर पद धारण करील आणि ती पुनर्नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.''**

सदर पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी स्वतःच्या तपशीलवार माहितीसह ज्यामध्ये शिक्षकीय व प्रशासकीय कामातील विशेष कामगिरी (Administrative Achievement) चा समावेश असेल आणि त्याचे/तिचे सदर पदाच्या उमेदवारीबाबत दोन पृष्ठांएवढे समर्थन, याबरोबरच, त्यांची विद्यापीठाच्या उत्कर्षाबाबत दूरदृष्टी (vision) याबाबतची २ पृष्ठे इतकी माहिती; तसेच त्यांच्या/तिच्या कामकाजाची ओळख असलेल्या तीन सुप्रसिद्ध व्यक्तींची नावे नमूद करून विहित नमुन्यात अर्ज करावा.

संस्थांनी सुद्धा सुयोग्य अशा उमेदवारांची नामनिर्देशने पाठवावीत.

सदर शोधसमितीने **श्री. आर. नारायणन, रजिस्ट्रार, इन्स्टिट्यूट फॉर सोशल ॲण्ड इकॉनॉमिक चेंज,** नागरभावी, बेंगलुरु-५६००७२. यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. **(e-mail:** narayanan@isec.ac.in **दूरध्वनी क्र. ०८०-२३२१७०११ (कार्य)/मो. नं. ०९४४८२३५०४९).**

**संबंधित उमेदवारांनी त्यांचा अर्ज/नामांकन संपर्क अधिकाऱ्याकडे दिनांक ५ डिसेंबर २०११ पूर्वी पाठवावा. उशिरा प्राप्त झालेले अर्ज/नामांकने विचारात घेतली जाणार नाहीत.**

आवश्यकता भासल्यास शोध समिती निवड सूचीतील उमेदवारांना, विचारांच्या आदान-प्रदानासाठी आमंत्रित करील.

शैक्षणिक प्रशासकांना उच्च शिक्षण क्षेत्रातील नवनवीन कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी/राबविण्यासाठी व विद्यापीठासारख्या प्रतिष्ठित अशा शैक्षणिक संस्थांना सर्वोत्कृष्ट बनविण्यासाठी ही सुसंधी लाभत आहे.

अध्यक्ष
शोध समिती

डीजीआयपीआर/२०११-२०१२/२१५४